REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER - 2017

# नव्वदोत्तर मराठी कथेचा रूपबंध

प्रा. डॉ. रविकांत शिंदे
मराठी विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

## प्रस्तावनाः-


१९९० नंतर देशात मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला गेला. व्यापार, उद्योगधंदे यांबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात जागतिकीकरणाचा याच कालखंडात शिरकाव झाला. मानवी जीवन त्यामुळे आंतर्बाह्य बदलून गेले. साहित्याची निर्मिती प्रक्रियाही यापासून अलिप्त राहू शकली नाही. रूढ संकेतांना, निर्मिती प्रक्रियांना, परंपरांना, रूपबंधांना छेद देण्याचा प्रयत्न प्रस्तुत कालखंडात झालेला दिसून येतो. मराठी कथेतही याबाबतीत सर्वार्थाने बदल झालेले दिसून येतात. परंपरेने आखून दिलेल्या रूपबंधात मराठी कथा अडकून पडल्यामुळे त्यातून बाहेर पडण्याची आवश्यकता या कालखंडात निर्माण झाली होती. हा रूपबंध मोडून काढण्याच्या आवश्यकतेतूनच नव्या आशयाची, नव्या रूपबंधाची कथा या कालखंडात निर्माण झाली. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून 'नव्वदोत्तर मराठी कथेचा रूपबंध' याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

## नव्वदोत्तर मराठी कथाकार :-

नव्वदोत्तरकालखंडातील प्रमुख कथाकार म्हणून आपणला रंगनाथ पठारे, भारत सासणे, मिलिंद बोकील, प्रवीण पाटकर, प्रतिमा जोशी, सदानंद देशमुख, राजन गवस, मधुकर धर्मापुरीकर, पंकज कुरूलकर, राजन खान, मेघना पेठे, प्रिया तेंडूलकर, मलिका अमर शेख, मोनिका गजेंद्रगडकर, नीरजा, मनस्विनी लता रविंद्र, जयंत पवार, आसाराम लोमटे, किरण गुरव, अभिराम भडकमकर, प्रशांत बागड, संजय भास्कर जोशी, गणेश मतकरी, सतीश तांबे, प्रणव सखदेव, जी. के. ऐनापुरे, समर खडस इ. कथाकारांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. मानवी जीवन बदलाच्या आंतर्बाह्य चित्रणा बरोबरच प्रस्तुत कालखंडातील कथाकारांच्या कथा भोवतालचे वर्तमान अत्यंत टोकदारपणे चित्रित करताना दिसतात.

## शतखंडीत वास्तवाला प्रतिबिंबित करणारी कथा :-

नव्वदोत्तरकालखंडात अस्तित्वात आलेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने मानवासमोर अनेक गंभीर प्रश्न उभा केले. या प्रक्रियेने निर्माण केलेल्या विभिन्न प्रश्नांना थेटपणे सामोरे जाण्याचे प्रयत्न प्रस्तुत कालखंडातील अनेक कथालेखकांनी केलेला दिसून येतो. मानवी जीवन जाणिवांचे अत्यंत खोलवरचे चित्रण या कालखंडातील बहुतांश कथाकारांच्या कथांतून येताना दिसून येते. नव्वद पूर्वीच्या कालखंडातील कथेपेक्षा सर्वार्थाने नव्या आशय, विषय, रूपाची कथा साकारण्याचा प्रयत्न या कालखंडात मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. भोवतालच्या संभ्रमित करणाऱ्या वर्तमानाने माणसाचे जगणे शतखंडीत वास्तवात रूपांतरीत झालेले दिसून येते. त्या शतखंडीत वास्तवाला टोकदारपणे चित्रित करण्याचा प्रयत्न या कालखंडातील सर्वच कथाकार करताना दिसून येतात. मानवी व्यक्तिमत्त्वाचे शतखंडीत प्रतिमांमध्ये झालेले रूपांतरण समजून घेतानाच त्या शतखंडीत वास्तवाने निर्माण केलेल्या प्रश्नांच्या सोडवणूकीचे अनेक पर्याय व प्रत्युत्तर प्रस्तुत कालखंडातील कथाकार अत्यंत समर्थपणे करताना दिसून येतात. म्हणूनच या कालखंडातील कथा केवळ नावीन्यपूर्णच नव्हे तर आंतर्बाह्य वेगळी असलेली दिसून येते.



## नव्वदोत्तर मराठी कथेची आशयसूत्रे :-

नव्वदोत्तरकालखंडातील कथांतून भोवतालच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचे समग्र चित्रण आलेले दिसून येते. व्यक्ती ते समष्टी हा नव्वदोत्तरकालखंडाचा स्थायीभाव असलेला दिसून येतो. जागतिकीकरणाच्या प्रभावाने सामाजिक जीवनात निर्माण केलेल्या प्रश्नांना प्रस्तुत कालखंडातील कथा गंभीरपणे सामोरी जाताना दिसते. कथाशयाचे बहुविध स्तर या कालखंडातील अनेक कथाकारांकडून हाताळले जाताना दिसतात.

'जयंत पवार'हे नव्वदोत्तरी कालखंडातील एक महत्वाचे कथाकार आहेत. त्यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' आणि 'वरनभात लोन्चा कोन

नाय कोन्चा' या कथासंग्रहांतून जागतिकीरणाने महानगरीय परिसरात राहणाऱ्या लोकांसमोर निर्माण केलेल्या संघर्षमय जीवनाचे नाट्यमय चित्रण अत्यंत तटस्थपणे आपल्यासमोर येताना दिसते. ''जयंत पवार हे 'कथा' या माध्यमाच्या नव्या शक्यता तपासून पाहणारे गंभीर लेखक आहेत. कोणत्याही चांगल्या लेखकाला पछाडणाऱ्या जन्म, मृत्यू, दुःख, क्रौर्य, हिंसा या गोष्टी पवारांच्या कथेत निव्वळ 'थीम्स' पुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर लेखकाच्या सतत सुरू असलेल्या चिंतनाचे विषय म्हणून समोर येतात. पवारांची कथा वाचकाला जगण्याच्या धुमश्चक्रीत मध्यभागी आणून उभी करते. या कथा म्हणजे व्यक्तीच्या समाजात जगण्याचे दसतऐवज आहेत. समाजात जगताना होणारे आनंद आणि त्रास त्यांच्या संपूर्ण व्यामिश्रतेसकट या कथा वाचकापुढे मांडतात. आजच्या मराठी साहित्यात पवारांची उपस्थिती आश्वासक आणि अधिक अपेक्षा निर्माण करणारी आहे.''१ सामान्य माणसासमोर जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या समस्यांवर जयंत पवारांची कथा गंभीर भाष्य करताना दिसते. आशयाच्या विभिन्न वैशिष्ट्यांनी त्यांची कथा समृद्ध झालेली दिसून येते. माणूस आणि त्याचा जगण्यासाठी विभिन्न पातळीवर सुरू असलेला जीवघेणा संघर्ष हा जयंत पवार यांच्या कथेचा स्थायीभाव असलेला दिसून येतो.

आशयाची दीर्घात्मक मांडणी हे जयंत पवार यांच्या कथेची नैसर्गिक मागणी असल्याचे दिसून येते. त्यांच्या जवळजवळ सर्वच कथा या दीर्घ स्वरूपाच्या असलेल्या दिसून येतात. ''रूपबंधाच्या नव्या शक्यता शोधताना स्वप्न, वास्तव, अद्भूतता यांच्या पायावर कथा उभी करताना जयंत पवार महानगरीय संवेदनेबरोबरच भारतीय संवेदना पकडण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. ऐंशी नंतर मराठी कथेला ओहोटी लागलेली असताना आणि महानगरीय कथा तर जवळपास हद्दपार झालेली असताना जयंत पवारांच्या कथेने एक आश्वासक पाऊल टाकले आहे. जागतिकीकरण, महानगरीय संवेदना, भाषिक संवेदन आणि या सगळ्यांमधून पिचत चाललेला व पिछाडीवर पडत चाललेला सामान्य माणूस कथेच्या केंद्रस्थानी ठेवून त्याच्या शोषणाच्या सगळ्या शक्यता तपासून पाहणारी ही कथा मराठी कथावाङ्मयात महत्त्वाची ठरणार आहे.''२ मानवी जीवन जाणिवांना समृद्ध करणारे अनेक प्रवाहच जणू आटत जावेत आणि माणुसकी नावालाही ऊरू नये याविषयीची खंत जयंत पवार यांच्या कथेतून प्रभावीपणे प्रतिबिंबित झालेली दिसून येते. माणसाच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाचे विविध कंगोरे उलगडत जाणारी त्यांची कथा नव्वद नंतरच्या दशकातील कथेचा आश्वासक चेहरा असलेला दिसून येतो.

मानवी नातेसंबंधात दिवसेंदिवस येत चाललेला शुष्कपणा काटेकोरपणे प्रतिबिंबित करण्यासाठी नव्वदोत्तर अनेक कथालेखक चाकोरीबाहेर जाऊन आशय आणि आविष्काराच्या बाबतीत नावीन्यपूर्ण मार्ग हाताळताना दिसतात. जयंत पवार या कथाकारांच्या मांदियाळीत अग्रस्थानी असलेले दिसून येतात. माणूस आणि त्याचा बदलता भवताल अत्यंत सूक्ष्मपणे अधोरेखित करतानाच त्यांची कथा मानवी नात्यांच्या अस्तित्व संघर्षाचा वैशिष्ट्यपूर्ण कॅनव्हास चित्रित करताना दिसते. 'छटाकभर रात्र तुकडातुकडा चंद्र' यांसारखी त्यांची वास्तव आणि कल्पिताचे वेगळे चित्र डोळ्यांसमोर उभारणारी कथा असो अथवा, 'साशे भात्तर रूपयांचा सवाल अर्थात युद्ध आमुचे सुरू !' ही मानवी स्वभाववैशिट्यांच्या संघर्षाचे अस्वस्थ करणारे चित्र उभी करणारी कथा असो. नावीन्यपूर्ण आशयसूत्रांसह रूपबंधाचा वैशिष्ट्यपूर्ण बाज त्यांच्या कथांत आपणास अनुभवयास मिळतो. एक परीपूर्ण वास्तव जीवन कहाणीच त्यांच्या कथांच्या माध्यमातून पात्रांच्या प्रयोगशील, नाट्यात्मक गुणधर्मांच्या अनुषंगाने आपणासमोर साकारत जाते.

सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या जगण्यातील हतबलतेला, अस्वस्थतेला, अपरिहार्यतेला, अपयशाला प्रभावीपणे आविष्कृत करण्याचा प्रयत्न नव्वदोत्तर कथा करताना दिसते. 'निळ्या दाताची दंतकथा' या प्रणव सखदेव यांच्या कथासंग्रहातून समकालाचे अचूक भान गोळीबंद आशयाच्या कथांतून, प्रयोगशील रूपबंधाच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसते. आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर या कथा सर्वार्थाने नावीन्यपूर्ण असलेल्या दिसून येतात. ''प्रणव सखदेव यांच्या कथांनी जागतिक वाङ्मयातील विविध प्रवाह, इतिहास, सामाजिक व राजकीय घटित आणि मानवी भूगोलशास्त्रातील उलथापालथी यांची जाण पचवलेली आहे. जटील व भयकारक वास्तव दाखवण्यासाठी त्या विविध आयुधांचं समर्पक उपयोजन प्रणव करतात आणि समकाळातल्या व्यक्तीचा चिरफाळलेपणा चितारतात.''३ मानवी भावभावनांचे, तिच्यातील गुंतागुंतीचे, कोरडेपणाचे चित्रण असलेल्या समकालीन वैविध्यपूर्ण संदर्भनिष्ठ आशयांनी प्रणव सखदेव यांची कथा वाचनीय ठरताना दिसते. मानवी जगण्याच्या गाभ्याला स्पर्शून येणारी त्यांची कथा समकालीन कथावाङ्मयातील एक महत्त्वपूर्ण कथा ठरताना दिसते. 'राज्य राणीचं होतं', 'रसातळाला ख.प.च.', 'माझी लाडकी पुतनामावशी', 'मॉलमध्ये मंगोल' यांसारख्या वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रहांच्या माध्यमातून सतीश तांबे यांनी मानवी जगण्यातील अनेक अलक्षित विषयांना पृष्ठस्तरावर आणण्याचा सफल प्रयत्न केलेला आहे. मानवी जीवनातील संघर्षाचा, लैंगिक जाणीवांचा, नात्यांतील गुंतागुंतीचा अत्यंत खोलवरचा वेध सतीश तांबे यांच्या कथांतून घेतला गेलेला दिसून येतो.

एकूणच नव्वदोत्तर कालखंडात बदलत्या रूपबंधाची, काळाची विभिन्न परिमाणे सामावून घेणारी आश्वासक कथा लिहिली गेली आहे. या कथा मानवी नात्यांच्या बदलत्या अनुबंधावर खोलवर भाष्य करणाऱ्या आणि मराठी कथावाङ्मयाला समृद्ध करणाऱ्या आहेत असे निश्चितपणे म्हणता येते.

संदर्भः-

चित्रे, निखिलेश, फिनिक्सच्या राखेतून उठला मोर, जयंत पवार, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, २०११, मलपृष्ठावरून उद्धृत.
कदम, महेंद्र, जयंत पवारांची कथा, परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ जानेवारी, २०१३, पृ.५५
वसपुते, गणेश, निळ्या दाताची दंतकथा, प्रणव सखदेव, वॉटरमार्क पब्लिकेशन, पुणे, प.आ. २०१५, मलपृष्ठावरून उद्धृत.

